

भू अभिलेख जिल्हा अधीक्षक यांची देव्हारे गावास भेट

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

अखेर राष्ट्रीय महामार्ग विभागाला आली जाग, आंजणारी घाटात गतिरोधक बसवण्यास सुरुवात

पान ८



रत्नागिरी • शनिवार २४ ऑक्टोबर, २०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० • वर्ष २२ • अंक ३४३ • पाने ८ • ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

## वेचक

### टायगर श्रॉफ गोळीबार : आरोपींना २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी

**मुंबई :** अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणातील कटात कथित सहभाग असल्याप्रकरणी अंकित खटाक, समीर खत्री आणि जतीन पांचाल या तिन्ही आरोपींना मुंबई गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने गुरुवारी एस्प्लेनेड न्यायालयात हजर केले. न्यायालयाने तिन्ही आरोपींना २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याआधी अटक करण्यात आलेल्या एका आरोपीने हा गोळीबार केला होता, तर हा त्रिकूट या गोळीबार प्रकरणामागील कटात सहभागी असल्याचा आरोप आहे. यातील आरोपी खटाक आणि खत्री हे वाँटेड (फरार) आरोपी अनिल

(पान २ वर)

# युवा हेच आमच्या केंद्रस्थानी

## मजबूत भारत घडवण्यात युवावर्गाची भूमिका महत्त्वाची : पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे चिन्मय अमृत महोत्सव जागतिक परिषदेचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. भारताचे युवा हे आमच्या सरकारी धोरणांच्या केंद्रस्थानी आहेत आणि एक मजबूत भारत घडवण्यात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असणार आहे, असे ते म्हणाले. त्यांनी भारत देशाला 'संस्कृतीची जन्मभूमी' असेही संबोधले.

### चिन्मय महोत्सव भारताच्या शाश्वत चेतनेचे प्रतीक

पंतप्रधान म्हणाले, हा कार्यक्रम संत चिन्मयजींचे आध्यात्मिक योगदान, देशाचा 'स्वातंत्र्यकाळातील अमृत महोत्सव' आणि भारतीय संस्कृतीचा गौरव यांचा अद्भुत संगम दर्शवतो. हा उत्सव भारताची शाश्वत चेतना, ज्ञान आणि आधुनिक प्रगती यांच्या संगमाचे प्रतीक

(पान २ वर)

### गीता आणि वेदांताचे ज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवा

पंतप्रधान मोदींनी भारतीय संस्कृती आणि आध्यात्मिक परंपरांचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, राष्ट्र हे संस्कृतीचे उगमस्थान आहे. त्यांनी भगवद्गीता आणि वेदांताचे ज्ञान शक्य तितक्या जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या गरजेवर भर दिला.

आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले, हा माझ्यासाठी एक अत्यंत भावनिक अनुभव आहे. चिन्मय ही केवळ एक संस्था नाही; ती एका चिन्मय ऋषींनी सुरू केलेली एक

(पान २ वर)

# शहर स्वच्छ ठेवणे हे झोपडपट्टीवासीयांचेही समान नागरी कर्तव्य - मुंबई उच्च न्यायालय

### सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर मुंबई उच्च न्यायालयाची टिप्पणी

**मुंबई (प्रतिनिधी)**

झोपडपट्टीवासीयांना 'सर्व काही मोफत मिळत आहे' आणि त्यांना शहरातील मोक्याच्या भागांमध्येच त्यांचे पुनर्वसन हवे आहे, मात्र, शहर स्वच्छ ठेवणे हे त्यांचेही समान नागरी कर्तव्य आहे, ही गोष्ट ते विसरतात, अशा शब्दांत सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना उच्च न्यायालयाने सुनावले. झोपडपट्टीवासीय हे शहराच्या एकूण लोकसंख्येचा अविभाज्य भाग असले, तरी इतर नागरिकांच्या स्वच्छ आणि

(पान २ वर)



### केवळ विवाहासाठी धर्मांतर करता येणार नाही

दरम्यान, केवळ विवाहासाठी धर्मांतर करता येणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ ला आव्हान देणारी याचिका मागे घेण्यात आली आहे. तथापि, आवश्यक तथ्यांसह नव्याने याचिका दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे. कायद्याच्या घटनात्मक वैधतेला ठाण्यातील ७० वर्षीय मुस्लीम धर्मोपदेशकाने आव्हान दिले होते. याचिकेत ठोस तथ्यांचा अभाव असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या

(पान २ वर)

## सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याचे राज्यपालांना निमंत्रण

### कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतली राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट

**नाशिक (प्रतिनिधी)**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपती महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण कुंभमेळा मंत्री तथा राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना दिले.



यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तयारीची तसेच सोहळ्याच्या नियोजनाची माहिती राज्यपालांना दिली. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर ही धार्मिक व सांस्कृतिक परंपरेची महत्त्वपूर्ण केंद्रे असून,

(पान २ वर)

# जिथून सुरू झाला प्रशासकीय सेवेचा प्रवास, त्या दापोलीच्या दर्शनाने सुखावले राज्याचे मुख्य सचिव!

### दापोलीला विशेष सदिच्छा भेट देत राजेश अग्रवाल यांनी प्रशासकीय कारकिर्दीच्या सुरुवातीच्या दिवसांतील आठवणींना दिला उजाळा

**प्रशांत कांबळे / दापोली**

प्रशासकीय सेवेच्या प्रदीर्घ प्रवासात अनेक गावं, शहरं, माणसं आणि जबाबदाऱ्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनतात. काळ पुढे सरकतो, पदं बदलतात, जबाबदाऱ्यांचा आवाका वाढतो; मात्र या प्रवासाची सुरुवात ज्या भूमीतून होते, त्या भूमीशी जोडलेली नाळ कायम मनात जपली जाते. याच भावनेचा प्रत्यय गुरुवारी दापोलीत आला. महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दापोलीला विशेष सदिच्छा भेट देत आपल्या प्रशासकीय कारकिर्दीच्या सुरुवातीच्या दिवसांतील आठवणींना उजाळा दिला.



राजेश अग्रवाल यांच्या नोकरीची सुरुवात दापोलीचे उपविभागीय अधिकारी (सहाय्यक जिल्हाधिकारी) म्हणून झाली होती. १९९१ ते १९९२ या काळात ते दापोलीत या पदावर कार्यरत होते. त्या काळातील दापोली, येथील माणसं, कामाचा अनुभव आणि प्रशासकीय सेवेच्या सुरुवातीच्या दिवसांशी जोडलेल्या आठवणी आजही त्यांच्या मनात ताज्या आहेत. त्यामुळे ही भेट केवळ शासकीय पदावरील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा दौरा नव्हता, तर आपल्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या पर्वाकडे पुन्हा वळून पाहण्याचा भावनिक क्षण होता. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध विभागामध्ये सेवा केल्यानंतर सेवाज्येष्ठतेनुसार राज्याचे मुख्य सचिव म्हणून त्यांची नियुक्ती

(पान २ वर)

## अमिताभ बच्चन यांच्या बंगल्यात बॉम्बची धमकी देणारा इमेल प्राप्त

### मुंबई पोलिसांकडून तपास सुरू

**मुंबई (प्रतिनिधी)**

ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या मुंबईतील बंगल्याला लक्ष्य करणारा बॉम्बची धमकी देणारा एक ईमेल शुक्रवारी मुंबई पोलिसांना प्राप्त झाला. मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल परिसरातील एका शाळेला हा धमकीचा मेल मिळाला होता. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला असून अधिक माहितीची प्रतीक्षा आहे.

मात्र, ही धमकी बच्चन यांच्या 'जलसा' की 'प्रतिक्षा'यापैकी नेमक्या कोणत्या बंगल्यासंदर्भात आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यापूर्वीही बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाला असाच एक धमकीचा ईमेल मिळाला होता, त्यानंतर पोलिसांनी तपासणी केली असता काहीही संशयास्पद आढळले नाही, असे मुंबई पोलिसांनी सांगितले. तसेच २० मार्च रोजी मुंबई प्रेस क्लबलाही एकाच स्वरूपाचा धमकीचा मेल प्राप्त झाला होता. इमारतीमध्ये विषारी वायूचे छोटे बॉम्ब पेरण्यात आल्याचा दावा त्या मेलमध्ये करण्यात आला होता. 'नीरज अजमल खान' नावाच्या व्यक्तीने हा मेल पाठवल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले होते. याआधीच्या

(पान २ वर)

### ओम प्रकाश माथूर केरळच्या राज्यपालपदी विराजमान

**तिरुअनंतपुरम :** ओम प्रकाश माथूर यांनी गुरुवारी तिरुअनंतपुरम येथील राजभवनात केरळचे २९ वे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. केरळ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्यायमूर्ती सौमेन सेन यांनी माथूर यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. याआधी त्यांनी सिक्कीमचे राज्यपाल म्हणून जबाबदारी सांभाळली होती. या शपथविधी सोहळ्याला केरळचे मुख्यमंत्री, न्यायमूर्ती, विविध मंत्री आणि आमदार उपस्थित होते. हा अत्यंत आनंदाचा क्षण असल्याचे सांगत राजकीय नेत्यांनी त्यांचे स्वागत केले आहे. राजस्थानचे

(पान २ वर)

## राजापुरात घरफोड्यांचे सत्र सुरूच; ओणी कोंडिवळे येथे घरफोडी

### सोन्या-चांदीच्या १ लाख ८ हजार रूपयांच्या दागिन्यांवर चोरट्यांचा डल्ला

**राजापूर (प्रतिनिधी)**

राजापूर तालुक्यात घरफोडींचे सत्र सुरूच असून खरवते, पाचल नंतर आता ओणी कोंडिवळे येथील गोतावडे वाडीमध्ये घरफोडी करून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने लांबविले आहेत. मंगळवार २० ऑक्टोबर २०२६ रोजी ही घटना घडली आहे.

ओणी कोंडिवळे गोतावडेवाडी येथील शामसुंदर गजानन शेट्ये यांच्या राहत्या घरात झालेल्या या चोरीत अज्ञात चोरट्याने एकूण १ लाख ८ हजार ७६५ रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी राजापूर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.४५ ते रात्री ९.४५ या कालावधीत शेट्ये यांच्या घरात कोणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घराच्या मागील दरवाजाची कडी तोडून तसेच दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले.

चोरीस गेलेल्या ऐवजात ८७ हजार ७६५ रुपये किंमतीचे १२.८५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि २१ हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने यांचा समावेश आहे. एकूण १ लाख ८ हजार ७६५ रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी राजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम

(पान २ वर)

## बोरघर घोलपवाडी येथे दुचाकी घसरून झालेल्या अपघातात स्वार जखमी

**खेड (प्रतिनिधी)**

गुरुवारी रात्री ड्युटीवर जात असताना बोरघर घोलपवाडी येथील पिनाक हॉटेलजवळ दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात खेड तालुक्यातील चिंचघर येथील सचिन कडू (वय ५०) हे होमगार्ड जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, पुढील उपचारांसाठी डेरवण येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री ८ वाजून ७ मिनिटांनी बोरघर घोलपवाडी परिसरातील पिनाक हॉटेलजवळ हा अपघात घडला. सचिन कडू हे दुचाकीने (एमएच ०८ बीडी ५१७० क्रमांकाच्या दुचाकीवरून ड्युटीवर जात असताना हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच जय हिंद ॲम्ब्युलन्सच्या मदतीने जखमी सचिन कडू यांना तातडीने कळंबणी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर

(पान २ वर)

## मेगा मिलेनियम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीवर ईडीची मोठी कारवाई

### मुंबई, दिल्लीसह कर्जतच्या फार्महाऊसमधून कोट्यवधींची रक्कम जप्त

**मुंबई (प्रतिनिधी)**



मेगा मिलेनियम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीवर ईडीने मोठी कारवाई करत छापेमारी केली आहे. या कारवाईत ईडीने कोट्यवधींची विदेशी आणि भारतीय चलन रक्कम जप्त केल्याची माहिती आहे. यासह मुंबई, दिल्ली आणि कर्जत येथील सुमारे अर्धा डझन ठिकाणी ईडीने छापेमारी केली आहे. या कारवाईत कंपनीची कार्यालये, संचालकांची मुंबई-दिल्लीतील निवासस्थाने आणि कर्जत येथील फार्महाऊसवर झाडाझडती घेण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, मुंबईतील कन्सल्टंट आणि व्यावसायिक हरीश देढिया

(पान २ वर)

## जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये मुंबई, दिल्लीचा समावेश

### मुंबईचा वायु गुणवत्ता निर्देशांक १६६ तर दिल्लीचा २०८ वर

**मुंबई (प्रतिनिधी)**

ऑक्टोबर महिन्यात मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेत मोठी घट झाली असून, शहराचा वायु गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) १६६ वर पोहोचला आहे. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'आयक्यूएअर'च्या रँकिंगनुसार मुंबईचा जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये समावेश झाला आहे. याच वेळी दिल्लीत सकाळी १०:३० वाजता एक्यूआयची नोंद २०८ इतकी करण्यात आली.

सध्या काही लाईव्ह ट्रॅकिंग प्लॅटफॉर्म्सवर मुंबईचा एक्यूआय सुमारे १६२ ते १७६ दरम्यान नोंदवला जात असून, यामुळे वाढत्या प्रदूषण लेव्हलबद्दल चिंता व्यक्त होत आहे. बांधकामांमुळे उडणारी धूळ, वाहनांच्या धुरामुळे होणारे प्रदूषण आणि हवेचा कमी वेग यामुळे मुंबईची हवा खालावत चालली आहे. दुसरीकडे, दिल्लीमध्येही एक्यूआयची पातळी वाढलेली असून, मॉनिटरिंग स्टेशन आणि वेळेनुसार ती १५१ ते २१८ दरम्यान बदलती दिसून येत

(पान २ वर)



### नागरिकांवर काय परिणाम?

प्रदूषणाच्या वाढत्या पातळीमुळे श्वसनाच्या आरोग्यावर, विशेषतः मुले, वृद्ध आणि दमा किंवा इतर फुफ्फुस व हृदयाच्या आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे

(पान २ वर)

